| MHAH180008182024 | केस दाखल दिनांक | ०२/०४/२०२४ |
|---|---|---|
| | केस नोंदणी दिनांक | ०२/०४/२०२४ |
| | केस निकाल दिनांक | २६/०५/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०२ ०१ २४ |

भाग – अ

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i) अन्वये)

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. ३, राहुरी यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी – आदित्य कृ. शिंदे)**

**(नियमित फौजदारी खटला क्र. १८२/२०२४)** **निशाणी क्र. २६**

**न्यायनिर्णय घोषीत दि. २६/०५/२०२६**

गुन्हा नोंद क्र. I १०१४/२०२३, राहुरी पोलीस स्टेशन, राहुरी

| | | | |
|---|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | : | | **महाराष्ट्र शासन** मार्फत<br>ठाणे अंमलदार, राहुरी पोलीस स्टेशन,<br>ता. राहुरी, जिल्हा –अहमदनगर |
| अभियोग पक्षातर्फे | : | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. एस. गांधले |
| आरोपी | : | १ | **श्रीधर एकनाथ गवांदे,**<br>वय– ५० वर्षे, धंदा– शेती. |
| | | २ | **संदिप बाबासाहेब गवांदे,**<br>वय – २७ वर्षे, धंदा – शेती. |
| | | ३ | **संकेत संदिप खुळे,**<br>वय – ३१ वर्षे, धंदा – शेती. |
| | | ४ | **सागर सुभाष वणे,**<br>वय – २५ वर्षे, धंदा – शेती.<br>सर्व रा. ब्राम्हणी,<br>ता. राहुरी, जि. अहमदनगर. |
| आरोपी क्र. १ ते ४ तर्फे विधीज्ञ | : | | **अॅड. श्री. आर. डी. बाचकर** |

भाग – ब
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | ०५/०९/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | ०६/०९/२०२३ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ०२/०४/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०९/१०/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | ०९/१०/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | :- | २६/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | २६/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | -- |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **श्रीधर एकनाथ गवांदे** | -- | -- | भा.द.वि. कलम ४५२, ३४२, ३३६, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | -- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | **संदिप बाबासाहेब गवांदे** | ''–'' | ''–'' | ''–'' | ''–'' | –– | –– |
| ३. | **संकेत संदिप खुळे** | ''–'' | ''–'' | ''–'' | ''–'' | –– | –– |
| ४. | **सागर सुभाष वणे** | ''–'' | ''–'' | ''–'' | ''–'' | –– | –– |

**न्यायनिर्णय**

(घोषित केल्याचा दिनांक – २६/०५/२०२६)

**१)** प्रस्तुत खटला आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४५२, ३४२, ३३६, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये उल्लंघन करुन पात्र गुन्हयाच्या शिक्षेसाठी संपरिक्षेस सामोरे जात आहेत.

२) **अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,**

दि. ०५/०९/२०२३ रोजी रात्री ०८.३० वाजताचे सुमारास फिर्यादी, त्यांचा मोठा मुलगा राहुल व दोन सुना असे त्यांचे राहते घरात असताना आरोपी क्र. १ ते ४ हे त्यांच्या घरात आले व त्यांचा मुलगा राहुल यास त्यांचे घरातील एका खोलीत कोंडून घेवून, त्यांच्या शेत जमीनीच्या सामाईक बांधाच्या वादावरून त्यांना शिवीगाळ करून आरोपी क्र. १ श्रीधर व आरोपी क्र. २ संदिप यांनी फिर्यादीला व त्यांच्या सुना शितल व अश्वीनी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच, त्यांना मारहाण करीत असताना त्यांच्या सुनाच्या गळयातील पोत तुटून नुकसान झाले आहे. आरोपी क्र. ३ संकेत व आरोपी क्र. ४ सागर यांनी त्यांच्या राहत्या घरावर दगड फेकले व म्हणाले की, तुम्ही जर आमचे नादी लागले तर तुम्हाला जिवे ठार मारून टाकु अशी धमकी दिली. म्हणुन, फिर्यादीने आरोपींविरोधात प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

**३)** वरीलप्रमाणे फिर्याद प्राप्त होताच राहुरी पोलीस स्टेशनला गु.र.नं. I–१०१४/२०२३, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४५२, ३४२, ३३६, ३२३, ५०४

व ५०६ सह कलम ३४ चे उल्लंघन करुन गुन्हा नोंदविला गेला. सदर गुन्हयाचा तपास हा पोलीस हेड कॉन्स्टेबल श्री. जे. के. खेमनर यांनी केलेला आहे. त्यांनी त्यांच्या तपासामध्ये साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा तयार केला. आरोपींना यांना समजपत्र् दिले. तपास पुर्ण होताच आरोपींविरोधात वरील कलमान्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४) आरोपींविरुध्द नि.क्र. १३ अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ४५२, ३४२, ३३६, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ चे उल्लंघन करुन पात्र गुन्हयाच्या शिक्षेसाठी दोषारोप ठेवले व त्यातील मजकूर हा आरोपींना वाचून व समजावून सांगितला असता सदरचा गुन्हा त्यांनी मान्य व कबूल नसल्याचे सांगून संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. प्रस्तुत आरोपींविरूद्ध कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५) प्रस्तुत खटल्यासाठी सहाय्यक अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञ यांचे युक्तीवाद ऐकले. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघाले व त्यावरील निष्कर्ष हे मी कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, दि. ०५/०९/२०२३ रोजी रात्री ०८.३० वाजताचे सुमारास मौजे ब्राम्हणी,ता. राहुरी येथे आरोपींनी संगनमत करून फिर्यादी यांना मारहाण करण्याची पूर्वतयारी करुन फिर्यादीचे राहते घरात घुसले म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधानाचे कलम ४५२ सह कलम ३४** अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीचा मुलगा राहुल यास घरात डांबून ठेवले म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधानाचे कलम ३४२ सह कलम ३४ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीचे घरावर दगडफेक करून इतरांचे जीवन किंवा वैयक्तिक सुरक्षितता धोक्यात आणणारे कृत्य केले म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधानाचे कलम ३३६ सह कलम ३४ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला व त्यांच्या सुनांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली आणि त्याद्वारे **भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ सह कलम ३४** अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा एखादा अपराध घडावा या उद्देशाने शिवीगाळ केली म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| ५. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीस दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ सह कलम ३४** अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला. | नाही. |
| ६. | काय आदेश ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

६) अभियोग पक्षाने त्यांची बाजु सिध्द करण्यासाठी सदरील प्रकरणामध्ये साक्षीदार क्र. १ हिराबाई लहानु जाधव– फिर्यादी यांची साक्ष नि.क्र. २३ वर नोंदविण्यात आली.

**मुद्दे क्र. १ ते ५ साठी –**

७) मुद्दे क्र. १ ते ५ हे एकमेकांशी संबंधीत आहेत. त्यामुळे, वरील सर्व मुद्दयांवरील पुराव्यातील तीच ती चर्चा टाळण्याकरीता मुद्दे क्र. १ ते ५ ची कारणमिमांसा मी एकत्रीत नोंदवित आहे. साक्षीदार क्र. १ हिराबाई (नि.क्र.२३) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, आरोपी हे त्यांचे शेजारी राहात असल्याकारणाने त्या त्यांना ओळखतात. घटना कधी व काय घडली होती हे त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांच्यामध्ये किरकोळ वाद झाल्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्या, त्यांचा मोठा मुलगा राहुल व दोन सुना असे त्यांचे राहते घरात असताना आरोपी क्र. १ ते ४ हे त्यांच्या घरात आले नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. आरोपींनी त्यांचा मुलगा राहुल यास त्यांचे घरातील एका खोलीत कोंडून घेतले नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांच्या शेत जमीनीच्या सामाईक बांधाच्या वादावरून आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून त्यांना व त्यांच्या सुना शितल व आश्वीनी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली नसल्याचे कथन केले आहे. आरोपी क्र. ३ संकेत व आरोपी क्र. ४ सागर यांनी त्यांच्या राहते घरावर दगड फेकले व म्हणाले की, तुम्ही जर आमचे नादी लागले तर तुम्हाला जिवे ठार मारून टाकु अशी धमकी दिली नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. तसेच त्यांना मारहाण करीत असताना त्यांच्या सुनाच्या गळयातील पोत तुटुन नुकसान झाले नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. सदर साक्षीदाराने फिर्याद वरील केवळ त्यांचा अंगठा (नि.पी.१) हा ओळखला. परंतु, फिर्यादमधील मजकुर त्यांना वाचून दाखविला नाही व सदरील मजकुर हा त्यांच्या सांगण्याप्रमाणे आणि बरोबर नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

८) साक्षीदार क्र. १ हिराबाई (नि. क्र.२३) यांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने विव्दान सरकारी वकीलांनी त्यांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उलटतपाससदृश सुचक प्रश्न विचारले. परंतु, त्यामध्ये देखील आरोपीविरूद्ध कुठलाही पुरावा आला नाही. फिर्यादी हिने स्वतः घटनेबाबतची कुठलीही वस्तुस्थिती मान्य केली नाही.

अभियोग पक्षातर्फे विचारण्यात आलेला फिर्यादीतील अधोरेखांकित भाग 'अ' त्यांना वाचुन दाखविण्यात आला. परंतु, त्यांनी तो पोलीसांना सांगितला नसल्याचे कथन केले आहे. साक्षीदाराने तिच्या व आरोपींच्या दरम्यान न्यायालयासमोर तडजोड झाली असल्याचे सांगितले. तसेच, आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे देखील त्यांनी सांगितले.

९) फिर्यादी यांनी न्यायालयात नि.क्र. २२ च्या पुरशिसव्दारे कळविले की, त्यांनी आपआपसात तडजोड केली आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणातील गुन्हे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२० (१) व (२) मध्ये आपसात तडजोड न करता येण्यासारखे असल्याने फिर्यादी व आरोपी यांच्या दरम्यान झालेल्या तडजोडीला कायदेशीर मान्यता व परवानगी देण्यात आली नाही. त्यांच्या मधील क्लेश वाढु नये व त्यांच्या दरम्यान शांतता राहावी या उद्देशाने दोन्ही पक्षांनी तडजोड केल्याचे दिसते.

१०) फिर्यादीने त्यांच्यामध्ये व आरोपींदरम्यान सदरचे प्रकरण आपसात मिटले असल्याचे व ते पुढे चालविणेचे नसल्याचे त्यांचे एकुण पुराव्याच्या अवलोकनार्थ समजते. फिर्यादीच्या पुराव्याचे एकंदरीत अवलोकन केले असता आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला दिसुन येत नाही. अभियोग पक्षाच्या संपुर्ण पुराव्याचे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपींच्या विव्दान वकीलांचे युक्तीवाद एकत्रीतरित्या ऐकल्यानंतर आरोपींविरुध्द वर नमुद गुन्हे सबळ पुराव्याविना सिध्द होत नसल्याचे दिसुन येते. वर नमुद मुद्दे सिध्द करण्यासाठी कुठलाही पुरावा उपलब्ध नाही. सबब, मुद्दे क्र. १ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. ६ साठी–</u>**

११) मुद्दे क्र. १ ते ५ साठी नोंदविलेली कारणमिमांसा विचारात घेता अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हयाचे घटक सिध्द केले नसल्याने सबळ पुराव्याविना आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत केल्याचे सिध्द होत नाही. मी मुद्दे क्र. १ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत. आज रोजी आरोपी गैरहजर असल्याने आणि सदरचा न्यायनिर्णय हा निर्दोष मुक्ततेचा असल्याकारणाने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३५३(६) अन्वये आरोपींच्या गैरहजेरीत उद्घोषित करण्यात आला. सबब, मुद्दे क्र. १ ते ५ च्या निष्कर्षान्वये तसेच, मुद्दा क्र. ६ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतोः–

## आदेश

| | |
|---|---|
| १ | ***आरोपी क्र. १ श्रीधर एकनाथ गवांदे, २ संदिप बाबासाहेब गवांदे, ३ संकेत संदिप खुळे व ४ सागर सुभाष वणे*** यांना भारतीय दंड संहितेचे कलम ४५२, ३४२, ३३६, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ चे पात्र शिक्षेच्या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपींचे जामीन व बंधपत्र हे रद्द करण्यात येत असून आरोपींना मुक्त करण्यात येत आहे. |
| ३ | या न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील झाल्यास त्याकामी हजर होणे करीता आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ नुसार रुपये १५,०००/- चे प्रत्येकी वैयक्तीक व जामीनदाराचे बंधपत्र दयावयाचे आहे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात आरोपीच्या विधीज्ञांच्या हजेरीत व आरोपीच्या गैरहजेरीत फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३५३(६) अन्वये उद्घोषित करण्यात आले).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
ADITYA KRISHNA SHINDE
2026.05.26 17:35:45 +0530

दिनांक – २६/०५/२०२६
राहुरी.

**(आदित्य कृ. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र. ३, राहुरी.

भाग क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| **सा.क्र.** | **साक्षीदारांचे नाव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| १ | हिराबाई लहानु जाधव | फिर्यादी | २३ |

(ब) बचाव पक्षातर्फे साक्षीदार : निरंक

(क) न्यायालयातर्फे साक्षीदार : निरंक.

## फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांक

**(अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि. पी. १ | फिर्यादीमधील केवळ फिर्यादीची सही |

(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी : निरंक.

(क) न्यायालयातर्फे निशाणी : निरंक.

(ड) महत्वपुर्ण वस्तु : निरंक.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
ADITYA KRISHNA SHINDE
2026.05.26 17:35:51 +0530

दिनांक – २६/०५/२०२६

राहुरी.

**(आदित्य कृ. शिंदे)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

(न्यायालय क्र. ३), राहुरी.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | ए. पी. कळमकर |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>न्यायालय क्र.३, राहुरी. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | २६/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | २६/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | २६/०५/२०२६ |